ResearchGate

See discussions, stats, and author profiles for this publication at: https://www.researchgate.net/publication/366496481

# Vermin (nuisance) wild animals & Wildlife Protection Act: An Overview

**Article** · December 2022

CITATIONS
0

READS
12

1 author:



Subhash Donde
Kirti M. Doongursee College of Arts, Commerce and Science (Autonomous)
**75** PUBLICATIONS **1** CITATION

SEE PROFILE

All content following this page was uploaded by Subhash Donde on 22 December 2022.

The user has requested enhancement of the downloaded file.

# वर्मिन (उपद्रवी) वन्यजीव आणि वन्यजीव संरक्षण कायदा : एक दृष्टिक्षेप

**डॉ. सुभाष भिमराव दोंदे**
प्राणिशास्त्र विभाग, किर्ती महाविद्यालय (स्वायत्त), दादर (प), मुंबई- 400 028.
ई-मेल : **dsubhash40@gmail.com**
व्हाट्सएप क्र :**9869556607**

**सारांश:**

*1972 चा वन्य जीव संरक्षण कायद्यात सर्वाधिक संरक्षण लाभलेल्या परिशिष्ट-I आणि परिशिष्ट-II मध्ये सूचीबद्ध केलेल्या वन्य प्राण्यां व्यतिरिक्त इतर कोणत्याही वन्य प्राण्याला वर्मिन (उपद्रवी) म्हणून घोषित करण्याची हा कायदा कलम 62न्वये परवानगी देतो. केंद्र सरकार, अधिसूचनेद्वारे, निर्दिष्ट केलेल्या वन्य प्राण्याला निर्दिष्ट केलेल्या क्षेत्रासाठी त्याचप्रमाणे निर्दिष्ट केलेल्या कालावधीसाठी वर्मिन (उपद्रवी) असल्याचे घोषित करू शकते आणि जोपर्यंत अशी अधिसूचना अंमलात आहे, तो पर्यंत अशा वन्य प्राण्यांचा परिशिष्ट V मध्ये समावेश केला जातो. पण 2021 च्या वन्यजीव (संरक्षण) दुरुस्ती विधेयकाची उपधारा 38 ही वन्य प्राण्यांना वर्मिन म्हणून घोषित करण्याशी संबंधित मूळ कायद्याच्या कलम 62 मध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करते. 2021 च्या दुरूस्तीमध्ये परिशिष्ट-V हे हटवले जाणार असून आता वर्मिन प्रजातींसाठी कोणतेही विशिष्ट परिशिष्ट (शेड्युल) नसेल. हे सुधारणा विधेयक केंद्राला कोणत्याही परिशिष्टातील प्रजातीला वर्मिन म्हणून घोषित करण्याचा आणि त्यांची मुक्तपणे शिकार करण्याचा थेट अधिकार देते. या कलमाला कोणताही शास्त्रीय तसेच संविधानीक आधार नाही. प्राण्यांनी केलेल्या उपद्रवाचे मूल्यमापन आणि वर्मिन म्हणून सूचीबद्ध करण्याची एक सुविचारित वैज्ञानिक आणि पारदर्शक प्रक्रियेची वानवा आहे. वन्य प्राण्यामुळे झालेल्या उपद्रव किंवा नाशाचा कोणताही तपशीलवार लेखा-जोखा किवा हिशोब द्यावा लागत नाही. केंद्र ही अधिसूचना राज्य सरकारांच्या विनंतीच्या आधारे जारी करते -संशोधनाच्या आधारे नव्हे. एखाद प्रजातीला वर्मिन म्हणून घोषित केले जाऊ शकते किंवा नाही हे निर्धारित करण्यासाठी केंद्र कोणतेही विशिष्ट मार्गदर्शक तत्त्व वापरत नाहीत. यामुळे कदाचित अतिसंरक्षित प्रजातींना देखील उपद्रवी किंवा वर्मिन म्हणून घोषित करून त्यांचे सुरक्षा कवच काढले जाईल परिणाम स्वरूप मग या वन्य प्राण्यांना कोणतेही कायदेशीर संरक्षण लाभणार नाही; ज्यामुळे त्यांची खुलेआम शिकार आणि व्यापार केला जाऊ शकतो. या पार्श्वभूमीवर मुळात अशा प्रकारे वन्यप्राण्यांना वर्मिन म्हणून घोषित करून त्यांची सामूहिक शिकार किंवा हत्या घडविणे हे कितपत योग्य आहे? तसेच महत्त्वाचे म्हणजे मानव-वन्यजीव संघर्षाच्या घटनांमध्ये वाढ होण्यामागे वन्य प्राण्यांचा अधिवास नष्ट होणे आणि विकासात्मक प्रकल्प, औद्योगीकरण आणि कृषी विस्तारा सारख्या मानवी अतिक्रमणा मुळे जंगलाचे आच्छादन कमालीचे कमी होणे ही सर्वात मोठी करणे आहेत. या संदर्भात अनेक पैलूंचा सदरहू संशोधन लेखात उहापोह केला गेला आहे.*

**मुख्य शब्द:** वर्मिन, वन्य जीव संरक्षण कायदा, सामूहिक शिकार, मानव-वन्यजीव संघर्ष

**प्रस्तावना:**

जगभरात नोंदवलेल्या एकूण वैविध्यपूर्ण प्रजातींपैकी जवळजवळ 8 टक्के प्रजातींचे निवास स्थान असलेला भारत हे एक मेगा-जैव विविधतेने नटलेले राष्ट्र आहे; जिथे 45,000 पेक्षा जास्त वनस्पती आणि

91,000 पेक्षा जास्त प्राणी प्रजाती सापडतात. जंगलात अधिवास करणाऱ्या समस्त वन्य जीवांच्या संरक्षण आणि संवर्धनार्थ भारताने 1972 साली वन्य प्राणी संरक्षण कायदा अंमलात आणला, ज्या मध्ये पुढे विशिष्ट अंतराने पण सातत्याने एकूण सात वेळा गरजे अनुरूप सुधारणा करण्यात आल्या. अगदी अलीकडे, डिसेंबर 2021 मध्ये, केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने या कायद्यात पुन्हा एकवार सुधारणा करण्याची योजना जाहीर केली आहे. तेव्हा वन्यजीव (संरक्षण) दुरुस्ती विधेयक, 2021 मध्ये ज्या काही नवीन सुधारणा केल्या गेल्या आहेत त्यातील फक्त 'वर्मिन' म्हणून ओळखल्या किंवा संबोधल्या गेलेल्या वन्यप्राण्यां बद्दल 1972 च्या मुळ कायद्यात काय तरतूद होती आणि 2021 च्या संशोधन विधेयकात त्यात काय बदल करण्यात आले आहेत? तसेच मुळात अशा प्रकारे वन्यप्राण्यांना वर्मिन म्हणून घोषित करून त्यांची सामूहिक शिकार किंवा हत्या घडविणे हे कितपत योग्य आहे? या संदर्भात अनेक पैलूंचा सदरहू लेखात उहापोह केला गेला आहे.

'वर्मिन' हा शब्द मूळच्या लॅटिन वर्मिस म्हणजे वर्म्स- किडा किंवा कृमी या शब्दावरून आला आहे; जो मूळतः विशिष्ट कीटकांच्या कृमी-सदृश अळयांसाठी वापरला जात होता. परंतु सदरहू लेखाच्या संदर्भात मात्र 'वर्मिन' हा शब्द मानवी जिवतास क्षती पोहचविणारे किंवा त्याच्या पशुधन, पिके, मालमत्ता यांची नासधूस करणारे वन्य प्राणी या अर्थाने अभिप्रेत आहे. 1972 चा मूळ कायदा 'वर्मिन' या शब्दाची व्याख्या करत नाही. पण, कायद्याच्या परिशिष्ट-I आणि परिशिष्ट-II मध्ये सूचीबद्ध किंवा समाविष्ट केलेल्या वन्य प्राण्यां व्यतिरिक्त इतर कोणत्याही वन्य प्राण्याला वर्मिन म्हणून घोषित करण्याची हा कायदा कलम 62 न्वये परवानगी देतो. खास वर्मिन म्हणून ओळखल्या गेलेल्या प्राण्यांची यादी मूळ कायद्याच्या परिशिष्ट-V मध्ये दिली आहे. पण 2021 च्या दुरूस्तीमध्ये परिशिष्ट-V हे हटवले जाणार आहे आणि आता वर्मिन प्रजातींसाठी कोणतेही विशिष्ट परिशिष्ट किंवा अनुसूची (शेड्युल) नसेल.

दुरुस्ती विधेयकाची उपधारा-38 ही काही वन्य प्राण्यांना वर्मिन म्हणून घोषित करण्याशी संबंधित मूळ कायद्याच्या कलम 62 मध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करते. मूळ कायद्याचे कलम-62 राज्य सरकारच्या विनंती वरून केंद्राकडे अशा उपद्रवी प्रजातींना वर्मिन म्हणून घोषित करण्याचा अधिकार देते; ज्यामध्ये या प्राण्यांच्या शिकारी किंवा सामूहिक हत्येसाठी विशिष्ट राज्यात किंवा प्रदेशात आणि विशिष्ट कालावधी साठी परवानगी दिली जाते. एखाद प्रजातीला वर्मिन म्हणून घोषित करण्याचा निर्णय फक्त राज्य सरकारच्या विनंतीवर अवलंबून असतो या खेरीज त्या प्रजातीला वर्मिन म्हणून घोषित केले जाऊ शकते किंवा नाही हे निर्धारित करण्यासाठी केंद्र कोणतेही विशिष्ट मार्गदर्शक तत्त्व वापरत नाहीत. यामुळे असंख्य महत्त्वाच्या कदाचित संरक्षित प्रजातींना देखील उपद्रवी किंवा वर्मिन म्हणून घोषित करून त्यांचे सुरक्षा कवच काढले जाईल आणि मग या प्राण्यांना कोणतेही कायदेशीर संरक्षण लाभणार नाही; ज्यामुळे त्यांची खुलेआम शिकार आणि व्यापार केला जाऊ शकतो. या निर्णयाला कोणताही शास्त्रीय तसेच संवैधानिक आधार नसल्याची अनेकांची चिंता आहे. प्राण्यांनी केलेल्या उपद्रवाचे मूल्यमापन आणि वर्मिन म्हणून सूचीबद्ध करण्याची एक सुविचारित वैज्ञानिक आणि पारदर्शक प्रक्रियेची वानवा असल्याने सिव्हेट मांजर, बेंगाल कोल्हा, स्ट्रीप्ड हायना, एशियाटिक जॅकल, रान डुक्कर, नीलगाय, रिसस माकडे या सारख्या प्राण्यांची आता ते उपद्रवी किंवा वर्मिन असल्याच्या नावाखाली शिकार केली जाऊ शकते.

यात अभिप्रेत असलेला मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी अलीकडे अनेक राज्यांनी भारतीय पोर्क्युपिन, बोनेट मॅकाक, कॉमन लंगूर, भुंकणारे हरिण या वन्य प्राण्यांना वर्मिन घोषित केले आहे. राज्य निहाय सांगायचे झाले तर हिमाचल प्रदेशात रिसस माकड, उत्तराखंड, महाराष्ट्र, तेलंगणा मध्ये रानडुक्कर,

बिहार मध्ये नीलगाय यांना वर्मिन म्हणून घोषित केले गेले आहे. पिकांचे नुकसान कमी करण्यासाठी महाराष्ट्र आणि गोवा राज्यांनी मोर आणि पश्चिम बंगालने कथितपणे हत्ती वर्मिन म्हणून घोषित करण्याची केंद्रा कडे विनंती केली आहे. 2021 च्या वन्यजीव (संरक्षण) सुधारणा विधेयकात केंद्राला कोणत्याही परिशिष्टातील प्रजातीला वर्मिन म्हणून घोषित करण्याचा आणि त्यांची मुक्तपणे शिकार करण्याचा थेट अधिकार मिळतो. त्यामुळे, प्राण्यांना वर्मिन म्हणून घोषित करण्याची प्रक्रिया सुलभ होते आणि 'वर्मिन' असे लेबल असलेल्या प्रजातींची संख्याही वाढते. या बदलांमुळे सस्तन प्राण्यांच्या 41 प्रजाती, 864 पक्षी, 17 सरपटणारे प्राणी आणि उभयचर प्राणी आणि 58 कीटकांवर परिणाम होऊ शकतो.

**गृहीतक:**

अतिसंरक्षित वन्यप्राणी वगळता इतर वन्यप्राण्यांना वार्मिन (उपद्रवी) ठरवून त्यांची हत्या घडविणारे 1971 च्या वन्यजीव संरक्षण कायद्याचे शास्त्रीय तसेच संविधानीक आधार नसलेले कलम-62 आता 2021 च्या दुरुस्ती विधेयकात अधिकच शिथिल केले गेले आहे; ज्याद्वारे संरक्षित प्रजातींना देखील वर्मिन म्हणून घोषित करून त्यांचे सुरक्षा कवच काढले जावू शकते, परिणाम स्वरूप परिशिष्ट-I आणि परिशिष्ट-II मधील अतिसंरक्षित वन्यप्राण्यांची देखील खुलेआम शिकार आणि व्यापार केला जाऊ शकतो.

**संशोधन पध्दती:**

मानवी अनुभवावर आधारित असलेल्या गुणात्मक संशोधनात परिवर्तनशील राशी ला परिमाणित न करता प्रमेय आणि सैद्धांतिक माहितीचा वापर केला जातो. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत लेख गुणात्मक विषय-वस्तु विश्लेषणाच्या अखत्यारीत असंरचित आणि गैर-संख्यात्मक डेटावर अवलंबून राहून समस्येचे नेमके स्वरूप समजून घेण्यासाठी संबंधित क्षेत्रातील तज्ञ आणि संशोधकांच्या संदर्भ-सूचीबद्ध प्राथमिक आणि प्रकाशित साहित्याचा एक समीक्षणात्मक अभ्यास आहे.

**विषय विवेचन:**

1950 मध्ये जेव्हा भारतात राज्यघटना स्वीकारली गेली आणि 1972 मध्ये जेव्हा वन्य प्राणी संरक्षण कायदा संमत झाला, तेव्हा पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करणारी कलमे राज्य घटनेत नव्हती. पण, नंतर कालौघात या पैलूकडे लक्ष वेधले गेले आणि 1976 मध्ये 42 व्या घटना दुरुस्तीने राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वां मध्ये वन्यजीव आणि जंगलांचे संरक्षण समाविष्ट केले. तेव्हा जंगले आणि वन्य प्राण्यांचे संरक्षण यांचाही समवर्ती सूची – सातव्या परिशिष्टा (अनुच्छेद 256) मध्ये समावेश करण्यात आला आहे. आता संविधानाच्या अनुच्छेद 51-A (g) मध्ये असे निहित केले आहे की जंगले आणि वन्यजीवांसह नैसर्गिक पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करणे हे प्रत्येक नागरिकाचे मूलभूत कर्तव्य आहे. तसेच घटनेच्या अनुच्छेद 48-A, अन्वये पर्यावरणाचे संरक्षण आणि सुधारणा करण्यासाठी आणि देशातील जंगले आणि वन्यजीवांचे संरक्षण करण्यासाठी राज्य बांधील असे राज्य धोरणाचे एक मार्गदर्शक तत्त्व आहे. सुप्रीम कोर्टाने आपल्या निर्णयांमध्ये मूलभूत अधिकारांची व्याप्ती आणि विषय वस्तू वाढवण्यासाठी राज्य धोरणांच्या मार्गदर्शक तत्त्वांवर अवलंबून राहून त्यांना न्याय्य हक्कांच्या कक्षेत आणले आहे. अशा प्रकारे, पर्यावरण आणि पर्यावरणाचे संरक्षण, शाश्वत विकासाच्या तत्त्वावर आधारित, विकासाचे परस्परविरोधी हित आणि निरोगी पर्यावरणाच्या रक्षणासाठी, जीवनाच्या अधिकाराचा एक पैलू म्हणून ओळखले गेले आहे. म्हणून पर्यावरण हे कुणाच्या मालकीची वस्तू

नसून भविष्यात येणाऱ्या पिढ्यांसाठी विश्वासार्हतेने जतन केलेली एक निसर्गाची देणगी आहे, हे स्वीकारलेले तत्त्व आहे.

1972 च्या वन्यजीव (संरक्षण) कायद्याचे कलम -62, केंद्राला कोणत्याही प्रजातीच्या वन्य प्राण्यांना कोणत्याही क्षेत्रात आणि विशिष्ट कालावधीसाठी 'वर्मिन' म्हणून घोषित करण्याचा अधिकार देते; ज्यामुळे त्या प्रजातीची सामूहिक हत्या केली जाऊ शकते. तथापि, अनेक तज्ञांनी अशा सामूहिक हत्येच्या विरोधात युक्तिवाद केला आहे की तसं केल्यानं मुख्य समस्येचं समाधान होत नाही म्हणजेच मानव-प्राणी संघर्ष संपुष्टात येत नाही. या पार्श्वभूमीवर, हे ही लक्षात घेण्यासारखे आहे की कलम-62 हे संविधानाच्या अनुच्छेद 14 आणि 21 चे सरळ सरळ उल्लंघन आहे तसेच राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत कर्तव्ये यांचे एकत्रित वाचन करून, वन्यजीवांवर परिणाम करणारे या कायद्याचे कलम-62 लागू करताना शासनाने सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. भारतीय राज्यघटनेचे अनुच्छेद 14 कायद्यासमोर समानता आणि समान संरक्षण प्रदान करते. अनुच्छेद 14 चे अनुपालन निर्धारित करण्याच्या चाचणीला ***मनमानीपणा प्रकटीकरण (मॅनीफेस्ट अर्ब्रिटरीनेस)*** म्हणतात. एखादा कायदा जेव्हा अपरिमित किंवा अत्याधिक आणि 'लहरी' असतो किंवा 'पुरेसे निर्धारक तत्त्व' नसल्यामुळे स्वेच्छाचारी असतो तेव्हा तो मनमानीपणाने ग्रस्त असतो. कलम-62 चे शब्द, जे केंद्राला कायद्याच्या परिशिष्ट-I आणि परिशिष्ट-II च्या भाग-II मध्ये सूचीबद्ध केलेल्या कोणत्याही वन्य प्राण्याला वार्मिन म्हणून घोषित करण्याची परवानगी देते, स्वतःच एक समुचित निर्धारक तत्त्व उघड करत नाही.

केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचना सूचित करतात की एखाद्या विशिष्ट प्रजातीला 'वर्मिन' घोषित केले जाऊ शकते की नाही हे निर्धारित करण्यासाठी केंद्र वापरत असलेली कोणतीही विशिष्ट तत्त्वे नाहीत. अधिसूचनांमध्ये फक्त असे नमूद केले आहे की प्राणी मालमत्तेसाठी, जीवनासाठी आणि पिकांना धोका बनले आहेत. एखाद्या विशिष्ट प्रजातीला 'वर्मिन' घोषित करण्याचा निर्णय हा पूर्णतः राज्य सरकारांच्या विनंतीवर अवलंबून आहे. राज्य एखाद वन्य जीवाला वार्मिन घोषित करण्यास केंद्राला जेव्हा विनंती करते तेव्हा त्यांना त्या प्राण्यामुळे झालेल्या उपद्रव किंवा नाशाचा कोणताही तपशीलवार लेखा-जोखा किवा हिशोब द्यावा लागत नाही. केंद्र ही अधिसूचना राज्य सरकारांच्या विनंतीच्या आधारे जारी करते -संशोधनाच्या आधारे नव्हे. त्यामुळे ही तरतूद कशी शब्दबद्ध केली जाते आणि ती कशी अंमलात आणली जाते या दोन्ही बाबतीत मनमानीपणाच्या प्रकटीकरणाने ग्रस्त आहे.

***एनिमल वेल्फेयर बोर्ड वि. ए. नागराज*** (2014) मधील निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने संविधानाच्या अनुच्छेद 21 अंतर्गत प्राण्यांना जगण्याचा अधिकार विस्तृत केला. या निर्णयामुळे वकील आणि संविधान तज्ञांकडून प्रथम आक्षेप घेतला गेला, परंतु देशभरातील उच्च न्यायालयांनी तो उद्धृत केला आणि त्याचा विस्तारपणे वापर केला. निरनिराळया उच्च न्यायालयांनी त्यांच्या निर्णयात प्राणी सृष्टीतील सर्व सदस्यांचे जिवंत व्यक्तींसारखेच विशिष्ट कायदेशीर अधिकार किंवा कायदेशीर अस्तित्व मान्य केले आहे. कुणी कितीही सदरहू निर्णयाशी असहमत असला तरी सध्या तो कायद्याचा आणि सदरहू कलमाचा न्यायसम्मत किंवा वैधानिक अर्थ आहे. घटनेच्या अनुच्छेद 21 च्या या विस्ताराचा अर्थ असा आहे की मानवांना लागू होणारे जीवन किंवा वैयक्तिक स्वातंत्र्यापासून वंचित न होण्याच्या अधिकारासह न्याय्य, निष्पक्ष आणि यथोचित समान संरक्षण - प्राण्यांना देखील लागू होते. वन्यजीव संरक्षणाच्या मूळ कायद्यातील कलम 62 चा वापर कसा

आणि कोणत्या परिस्थितीत केला जाऊ शकतो याबद्दल कोणतीही क्रियाविधी संबंधी मार्गदर्शक तत्त्वे नाहीत. परिणामी, कोणते प्राणी वर्मिन म्हणून पात्र आहेत हे ठरविण्याचा सरकारचा निरंकुश निर्णय आहे.

भारतीय राज्यघटनेतील वन्यजीवांचा पहिला उल्लेख राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वांचा चा एक भाग असलेल्या अनुच्छेद 48A मध्ये आहे. त्यात असे नमूद केले आहे की पर्यावरणाचे संरक्षण आणि सुधारणा करण्यासाठी आणि जंगले आणि वन्यजीवांची सुरक्षा करण्यासाठी राज्य प्रयत्न करेल. या अनुषंगाने अनुच्छेद 51A(g) न्वये मुलभूत कर्तव्यांतर्गत "जंगल, तलाव, नद्या आणि वन्यजीवांसह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण आणि सुधारणा करणे आणि सजीव प्राण्यांबद्दल सहानुभूती बाळगणे" हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. एखाद प्रजातीला वर्मिन म्हणून घोषित करण्याच्या निर्णयात सार्वजनिक दबावा सारखे बाह्य-घटक देखील कारणीभूत ठरू शकतात. जेव्हा अशा स्वरूपाची पर्यावरणीय समस्या निवारणा साठी न्यायालयासमोर आणली जाते; तेव्हा न्यायालयाने घटनेचे अनुच्छेद 48A आणि 51A(g) लक्षात ठेवावे असे ही एका प्रकरणातील खंडपीठाने म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाने नंतरच्या एका प्रकरणात असे सांगितले की जेव्हा एखाद्या वैधानिक तरतुदीची किंवा कार्यकारी कायद्याची घटनात्मक वैधता तपासण्याच्या प्रश्नाचा सामना करावा लागतो तेव्हा राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे आणि मूलभूत कर्तव्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. आणि या सर्व प्रकरणांचे एकत्रित वाचन हे स्पष्ट करते की वन्यजीव संरक्षण कायद्याचे कलम- 62 पुनर्विचारास पात्र आहे. विशेषत: कोणत्या परिशिष्टातील प्राणी शिकार करण्याच्या 'पात्र' आहेत हे ठरवताना अधिक सावधगिरी बाळगता येण्यासाठी वन्यजीव संरक्षण कायद्याच्या कलम 62 ऐवजी कलम 11(1)(b) पासून प्रेरणा घ्यायला हवी. हे कलम मुख्य वन्यजीव वॉर्डन किंवा अधिकृत अधिकारी यांना धोकादायक बनलेल्या परिशिष्ट-II, III आणि IV मधील समाविष्ट प्राण्याची शिकार करण्यास परवानगी देते. त्यामुळे एखाद्या प्राण्याची शिकार केली जाऊ शकते किंवा नाही हे ठरवण्याची सीमारेखा वाढवते तसेच शिकार केवळ त्या विशिष्ट प्राणी किंवा प्राण्यांच्या गटांपुरती मर्यादित राहते. आपली घटनात्मक चौकट मानव आणि उर्वरित परिसंस्था यांच्यातील सुसंवादी नातेसंबंधाची कल्पना करते. परंतु कलम-62 हे नेमकं या नाजूक नातेसंबंधाला धोका देते तसेच करुणा, सहानुभूती आणि इतर जीवसृष्टीबद्दलचा आदर या आपल्या मूलभूत मानवी मूल्यांना आव्हान देते.

वर्ल्ड वाइड फंड फॉर नेचर अँड युनायटेड नेशन्स एन्व्हायर्नमेंट प्रोग्राम (2021) च्या अलीकडील अहवालात असे म्हटले आहे की मानव-वन्यजीव संघर्ष हा अनेक वन्यजीव प्रजातींच्या दीर्घकालीन अस्तित्वासाठी सर्वात मोठा धोका आहे. शिवाय, देशाच्या विविध भागांतून पीक/पशुधनाच्या नुकसानीच्या स्वरूपात मानव-वन्यजीव संघर्ष च्या घटना मोठ्या प्रमाणावर नोंदवल्या जात आहेत. उदाहरणार्थ, 2016 मध्ये, हिमाचल प्रदेश कृषी विभागाने वन्य प्राण्यांमुळे, विशेषतः रिसस माकडांमुळे □184.28 कोटींचे पीक नुकसान नोंदवले आहे, त्याचप्रमाणे, 2017 पासून संपूर्ण तामिळनाडूमध्ये वन्य प्राण्यांकडून पिकांवर धाडी मारण्याची 7,562 प्रकरणे नोंदवली गेली आहेत. दुसरीकडे, प्राणी मारल्याबद्दल कोणतीही अधिकृत आकडेवारी अस्तित्वात नाही. अहवालानुसार, बिहार सरकारने पिकांच्या नुकसानीला सामोरे जाण्यासाठी 2016 मध्ये नीलगायींना वर्मिन म्हणून घोषित केले. 2016 आणि 2019 दरम्यान, सुमारे 4,729 नीलगाय मारण्यात आले. कर्नाटक सरकारने 2016 मध्ये पिकांच्या नुकसानीच्या नावाखाली रानडुकरांना मारणे कायदेशीर केल्यानंतर कर्नाटकातील नागरहोल राष्ट्रीय उद्यानात त्यांना पकडण्यासाठी सापळ्यांची संख्या वाढली. मात्र, या सापळ्यात वाघ, बिबट्या, अस्वल यांसारखे प्राणीही अडकत होते. हे तिन्ही प्राणी 1972 च्या मूळ कायद्याचे

सर्वोच्च संरक्षण असलेल्या परिशिष्ट I मधील प्राणी आहेत आणि ज्यांच्या शिकारी विरूद्ध या कायद्यानुसार सर्वोच्च शिक्षा आहे.

कर्नाटक राज्य सरकार, म्हैसूर विद्यापीठ आणि सलीम अली सेंटर फॉर ऑर्निथोलॉजी अँड नॅचरल हिस्ट्री यांच्या डेटावरून असे दिसून आले आहे की या वर्मिन प्रजातींची लोकसंख्या एकंदरीत घटली आहे आणि मोठ्या प्रमाणावर वर्मिन प्रजातींचा नाश करून देखील मानव-वन्यजीव संघर्ष वाढतच गेला आहे. याच संस्थांच्या 2020 च्या जनगणनेनुसार हिमाचल प्रदेशातील रिसस माकडांची लोकसंख्या 33.5% ने कमी झाली आहे. 2016 पासून या प्राण्याला चार वेळा वर्मिन म्हणून घोषित करण्यात आले आहे. रिसस लोकसंख्या कमी असूनही, संघर्ष मात्र उत्तरोत्तर वाढत आहे. हा संघर्ष वाढण्याचे एक कारण हे आहे की बहुतेक वेळा रिसस माकडांच्या अवैज्ञानिक हत्यांमुळे त्यांच्यातील अधिकार पदानुक्रमात व्यत्यय येतो. जेव्हा रिसस पॅकचा अल्फा नर मारला जातो किंवा काढून टाकला जातो तेव्हा पॅक त्याची अखंडता गमावतो. अल्फा नराच्या अनुपस्थितीत ग्रुप मधील इतर आश्रित सदस्यांना कसे वागावे हे कदाचित माहित नसावे आणि त्यामुळे हाहाकार होऊ शकतो आणि मानव प्राणी संघर्ष अधिक तीव्र स्वरूपात निर्माण होऊ शकतो. इतर देशांमध्ये केलेल्या संशोधनात असे दिसून आले आहे की मानव-वन्यजीव संघर्ष व्यवस्थापनाचे गैर-प्राणघातक माध्यम प्राणघातक मार्गापेक्षा अधिक प्रभावी आहेत अमेरिका, स्लोव्हेनिया, फ्रान्स आणि इतर उत्तर युरोपीय देशांमधील विद्यमान प्रकाशित साहित्याच्या पुनरावलोकनातून असे दिसून आले आहे की केवळ विषबाधा आणि सापळा यासारख्या प्राणघातक पद्धती कमी प्रभावी होत्या असे नाही तर ते पशुधनावरील हल्ले वाढवतात. प्राणघातक पद्धतीं ऐवजी गैर-प्राणघातक पद्धती तैनात करण्यापूर्वी तिची परिणामकारकता आणि पुराव्यासाठी कित्येकदा चाचणी घेण्यात आली. गैर-प्राणघातक पद्धतींमध्ये पशुधनाचे रक्षण करणारे प्राणी, प्रतिबंधक आणि तिरस्करणीयक, डायव्हर्शनरी फीडिंग आणि नसबंदी यांचा समावेश होतो.

महत्त्वाचे म्हणजे, मानव-वन्यजीव संघर्ष शमन करण्याचे साधन म्हणून मोठ्या प्रमाणावर होणारी हत्या हे हा संघर्ष का वाढत आहेत याचे खरे कारण शोधत नाही. मानव-वन्यजीव संघर्षाच्या घटनांमध्ये वाढ होण्यामागे वन्य प्राण्यांचा अधिवास नष्ट होणे आणि मानवी अतिक्रमण हे सर्वात मोठे कारण आहे. विकासात्मक प्रकल्प, औद्योगीकरण आणि कृषी विस्तारामुळे जंगलाचे आच्छादन कमालीचे कमी झाले आहे, त्यामुळे वन्य प्राणी कृषी वसाहतींजवळ आले आहेत. नीलगाय आणि रानडुक्करांनी निसर्गाच्या या मानवी बदलाशी जुळवून घेतले आहे आणि त्यांची संख्या वाढली आहे, तसेच ते पर्यावरणीय दृष्ट्या देखील विस्थापित झाले आहेत. मानवी लोकसंख्या आणि विकास प्रकल्पांच्या झपाट्याने विस्तारामुळे आणि वन्यजीवांचे अधिवास कमी झाल्यामुळे, भारताच्या अनेक भागांमध्ये मानव-वन्यजीव संघर्षाची तीव्रता, वारंवारता आणि जटिलता वाढली आहे. तथापि, वर नमूद केल्याप्रमाणे, एखाद्या प्राण्याला वर्मिन घोषित करणे हे हा संघर्ष कमी करण्यासाठी शाश्वत किंवा प्रभावी उपाय नाही. यामुळे अवैज्ञानिक हत्या होतात आणि मानव-वन्यजीव संघर्षाचा धोका वाढतो. 2021 चे नवीन दुरुस्ती विधेयक प्राण्यांना वर्मिन म्हणून घोषित करण्याची व्याप्ती वाढवते आणि यामुळे केंद्र सरकारच्या अधिकारांचा अखंड वापर होऊ शकतो. परिणामी, पीक नुकसानीच्या प्रमाणात डेटाबेस राखण्याची आणि समस्या निर्माण करणारे प्राणी आणि संघर्षाच्या नमुन्यांवरील वैज्ञानिक सर्वेक्षण किंवा जनगणना करण्याची तातडीची गरज आहे. डेटाशिवाय घेतलेल्या अवैज्ञानिक आणि आकस्मिक निर्णयांचा परिसंस्थेवर आणि जैवविविधतेवर दीर्घकाळ प्रतिकूल प्रभाव पडेल.

**निष्कर्ष:**

मानव-वन्यप्राणी संघर्ष कमी करण्यासाठी, अधिक जैव-सामाजिक दृष्टीकोन आवश्यक आहे ज्यामध्ये वैज्ञानिक व्यवस्थापन, प्राण्यांच्या वर्तनाचा अभ्यास, लँडस्केप आणि सामाजिक-आर्थिक संदर्भ यांचा समावेश आहे. सावधगिरीचे उपाय जसे की प्राणी चेतावणी प्रणाली तैनात करणे, देखरेख करणे आणि प्राण्यांच्या हालचालींबद्दल लोकांना सार्वजनिक माहिती प्रदान करणे आणि स्थानिक समुदाय आणि संस्थांचा सक्रिय सहभाग मानव वन्य प्राणी संघर्ष कमी करण्यात मदत करेल. उदाहरणार्थ, दिल्लीस्थित मेकॅनिकल इंजिनीअरिंगच्या एका विद्यार्थ्याने एनिमल इंट्रुजन डिटेक्शन अँड रिपेलेंट सिस्टीम यंत्राचा शोध लावला, जो प्रकाश आणि ध्वनी यांच्या मिश्रणाचा वापर करून प्राण्यांना घाबरवतो आणि जेव्हा घुसखोरी आढळते तेव्हाच ट्रिगर होते. शिवाय, पिकांचे आणि मालमत्तेचे नुकसान होण्यापासून वन्य प्राण्यांना परावृत्त करण्यासाठी विज्ञान-आधारित हस्तक्षेपांचा अवलंब करण्याची गरज आहे. उदाहरणार्थ, एका अभ्यासात नीलगायी चमकदार परावर्तित पदार्थांपासून कसे घाबरतात यावर प्रकाश टाकला आणि शेतकरी अशा प्रकारे पिकांच्या शेताभोवती काठीवर बांधलेल्या सीडीचा वापर करून नीलगायांना पिकांचा नाश करण्यापासून रोखू शकतात. 2015 मधील आणखी एका अभ्यासात असे आढळून आले की न्हाव्याच्या दुकानातून पिकांच्या आसपास गोळा केलेले मानवी केस पसरवल्याने शेतातील जंगली डुकरांकडून होणारे नुकसान 40-50% पर्यंत नियंत्रित होते, कारण डुकरांना त्यांच्या नाकपुड्याला केस चिकटलेले आवडत नाहीत याव्यतिरिक्त, असुरक्षित क्षेत्रांभोवती जैव कुंपण आणि वीज कुंपण प्रदान केल्याने प्राण्यांना दूर ठेवण्यात मदत होऊ शकते.

अलीकडेच सरकारने एक सकारात्मकपाऊल उचलले आहे ज्यात वन्यजीवांमुळे किंवा अन्य कारणांमुळे होणाऱ्या नुकसानाची प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत भरपाई केले जाईल. मानव-वन्यप्राणी संघर्षा मुळे होणारी मानवी हानी कमी करण्यासाठी स्थानिक सुविधा जसे की प्रकाश व्यवस्था, शौचालये आणि ग्रामीण सार्वजनिक बस सेवा वाढवण्याची आणि कचऱ्याच्या ढिगाची उत्तम विल्हेवाट लावण्याची यंत्रणा तयार करणे, माकडांसारख्या प्राण्यांना कुतूहल, श्रद्धा दानधर्म खायला घालणे टाळणे फायदेशीर ठरेल. सामूहिक हत्या हा या समस्येवरचा उपाय नाही, कारण तो असंविधानिक तर आहेच शिवाय पर्यावरणीय असंतुलन आणि ऱ्हास या दुष्टचक्रात भर घालतो. या पार्श्वभूमीवर पिकांसह प्राणी आणि मानवी जीवनाचे नुकसान कमी करण्यासाठी आणि मानव-वन्यप्राणी संघर्ष अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी तथाकथित वर्मिन ची लोकसंख्या आणि वर्तन आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्या साठीच्या उपाय योजनांचा वैज्ञानिक अभ्यास हा सर्वोत्तम मार्ग आहे.

**संदर्भ-सूची**

1. **Parthasarrathy Malavika and Apporva** (14th Aug; 2020) Is It Constitutional to Declare Wild Animals to Be 'Vermin'? https://science.thewire.in/law/animals-vermin-section-62-wildlife-protection-constitutionality/
2. **Gupta Avni** (2nd March, 2022) Is WPA Amendment The Knight In Shining Armor For Wildlife Conservation? https://wildlifesos.org/conservation-awarness/is-wpa-amendment-the-knight-in-shining-armor-for-wildlife-conservatio
3. **CI Team (May 2011)** The Constitutional Imperatives in the Protection of Wildlife https://www.conservationindia.org/resources/the-constitutional-imperatives-in-protection-of-wildlife

4. **Raj Arushi and Victor Arpita** (5th April 2022) Politics of Vermin: The Need for Evidence-based Human- Wildlife Conflict Mitigation https://sprf.in/politics-of-vermin-the-need-for-evidence-based-human-wildlife-conflict-mitigation/
5. **Shrinivasan Sonia** (6th August; 2021) Vermin u/s 62 of the Wildlife Protection Act, 1972 https://blog.ipleaders.in/vermin-u-s-62-of-the-wildlife-protection-act-1972/#What_are_the_proposed_alternatives



View publication stats